**<u>ठळक बातम्या</u>**

- मुंबई आणि उपनगरांसह राज्याच्या विविध भागात जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत/ आवश्यक असेल तरच घराबाहेर पडण्याचं प्रशासनाचं आवाहन
- पावसाशी संबंधित दुर्घटनांमधे राज्यात ८ जणांचा मृत्यू, तर सुमारे १२ ते १४ लाख एकर क्षेत्रावरच्या पिकांचं नुकसान
- राज्यात ४२ हजार ८९२ कोटी रुपयांची गुंतवणूक करारांवर आज स्वाक्षऱ्या
- उपराष्ट्रपतीपदासाठी इंडिया आघाडीची उमेदवारी निवृत्त न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांना जाहीर

**आणि**

- ज्येष्ठ चरित्र अभिनेता अच्युत पोतदार यांचं निधन

**<><><><><><>**

राज्यात सर्वत्र गेल्या तीन-चार दिवसांत मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यात ८ जणांचा बळी गेला असून सुमारे १२ ते १४ एकरावरच्या पिकांना फटका बसल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज वार्ताहरांशी बोलताना दिली. ते म्हणाले,

***होल्ड… बाईट- देवेंद्र फडणवीस***

मुंबईसह राज्याच्या बहुतांश भागात पावसाचं थैमान अखंड सुरू आहे. **मुंबई शहर आणि उपनगरांत** आज सकाळपासून पावसाच्या जोरदार सरी कोसळत आहेत. यामुळे रस्ते आणि रेल्वे वाहतूक, आणि जनजीवन विस्कळीत झालं आहे. आज पहाटे चार ते सकाळी ११ पर्यंत १५० मिलिमीटरपेक्षा जास्त पाऊस झाला असून उपनगरात पावसाचं प्रमाण अधिक असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये दिली.

दरम्यान, सततच्या पावसामुळे समुद्र खवळला असून चार मीटर उंचीच्या लाटा उसळत आहेत. मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या रुळांवर पाणी साचल्यानं वाहतुकीवर परिणाम झाला आहे. अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. शहरातल्या अनेक रस्त्यांवर पाणी साचल्यानं वाहतूक ठप्प आहे. बेस्ट बसगाड्यांचे मार्ग वळवण्यात आले असून आवश्यक असेल तरच घराबाहेर पडावं, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे. मुंबई विद्यापीठाच्या आज होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत.

वाढत्या पावसाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सकाळी राज्य आपत्ती व्यवस्थापन केंद्रात पावसाच्या परिस्थितीचा आढावा घेतला. राज्यभरात १० लाख एकर शेती पाण्याखाली गेल्याची माहितीही पवार यांनी दिली.

मुंबई उपनगरचे सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा, तसंच आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनीही परिस्थितीचा आढावा घेून संबंधित विभागांना सतर्क राहायच्या सूचना दिल्या.

राज्यात इतरत्रही मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. अनेक ठिकाणी दरडी कोसळून रस्ते बंद झाले आहेत तर अनेक ठिकाणी नद्यांची पात्रं फुगली असून अनेक गावांना पुराचा वेढा बसला आहे.

**नवी मुंबईत** सकाळपासून पावसाचा जोर कायम असून सखल भागात पाणी साचलं आहे.

**पालघर** जिल्ह्यातही सर्वत्र कालपासून पावसाची संततधार सुरू असून सूर्या नदीला पूर आला आहे.

**नांदेड** जिल्ह्यात पूरस्थितीमुळे काल चौघांचा मृत्यू झाला, तर पाच जण बेपत्ता आहेत.

**लातूरमध्ये** उदगीर तालुक्यातल्या लेंडी नदीला आलेल्या पुरामुळे दोनशेपेक्षा जास्त नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं. या पुरात अनेक जनावरं

वाहून गेली आणि ७० घरांमध्येही पाणी शिरलं. **सातारा जिल्ह्यात** कृष्णा कोयना आणि वारणा नद्यांना पूर आला असून नदीकाठच्या रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवलं आहे.

**सांगली** जिल्ह्यात जोरदार पाऊस सुरू असून कृष्णा आणि वारणा नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे.

**गडचिरोलीत** पहाटेपासून संततधार पाऊस कोसळत आहे.

**धाराशीव** जिल्ह्यातले महत्त्वाचे प्रकल्प पूर्ण क्षमतेनं भरली आहेत.

**बुलडाणा** जिल्ह्याच्या चिखलीमध्ये एकजण पुरात वाहून गेला. हजारो हेक्टरवरची पिकं पाण्याखाली गेली असून अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

**रत्नागिरी** जिल्ह्यालाही पावसाचा मोठा फटका बसला आहे. याबद्दल अधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून.

***होल्ड... व्हीसी- अनिकेत कोनकर***

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात गेल्या चार दिवसांपासून पावसाचा जोर वाढल्यामुळं जनजीवन पूर्णतः विस्कळीत झालं आहे.

**ठाणे, रायगड, परभणी, कोल्हापूर, साताऱ्यातही** जोरदार पाऊस होत आहे.

**<><><><><><>**

सौरऊर्जा आणि विदा क्षेत्रातल्या १० सामंजस्य करारांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज मंत्रालयात स्वाक्षऱ्या झाल्या. या सामंजस्य करारांमुळे राज्यात ४२ हजार ८९२ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून २५ हजार ८९२ रोजगारांची निर्मिती होणार असल्याची माहिती यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली.

**<><><><><><>**

मुंबईतल्या टाटा मेमोरियल सेंटरच्या एकात्मिक आयुर्वेदिक कर्करोग दवाखाना आणि संशोधन केंद्रात १०० खाटांचं रुग्णालय उभारण्यासाठी मुद्रांक शुल्क माफ करण्याचा  निर्णय आज राज्य मंत्रिमंडळाने घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची बैठक आज मुंबईत झाली. राज्यातल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात गट क आणि तांत्रिक संवर्गात २९ दिवस तत्त्वावर कार्यरत १७ कर्मचाऱ्यांची तातपुरती सेवा नियमित करण्याला मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.

<><><><><><>

उपराष्ट्रपतीपदाच्या आगामी निवडणुकीसाठी इंडी आघाडीकडून सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. इंडी आघाडीच्या सर्व घटकपक्षांनी एकमताने रेड्डी यांच्या नावाला संमती दिल्याची माहिती काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज नवी दिल्लीत इंडी आघाडीच्या घटकपक्षांच्या संयुक्त वार्ताहर परिषदेत दिली.

<><><><><><>

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाच्या  आज नवी दिल्ली इथं झालेल्या बैठकीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एनडीएचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांचा परिचय करून दिला, आणि त्यांची एकमतानं निवड करण्याचं आवाहन केलं.

<><><><><><>

बिहारमधल्या मतदार याद्या पुनरिक्षणासंदर्भात आणि इतर मुद्यांवर विरोधी पक्षांनी प्रचंड गदारोळ केल्यामुळे आज संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं होतं. नंतरही लोकसभेचं कामकाज संध्याकाळी ४ वाजेपर्यंत तहकूब केलं.

त्यापूर्वी लोकसभेत सभापती ओम बिर्ला यांनी, राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीतल्या सगळ्या भाषांमध्ये अनुवाद आणि भाषांतराची सुविधा सभागृहात उपलब्ध झाल्याची घोषणा केली.

भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव आज लोकसभेत चर्चेला आला. राज्यसभेत खनिज सुधारणा विधेयकावर चर्चा सुरु झाली आहे. विरोधी पक्षांच्या सदस्यांनी आजही संसदेच्या आवारात निदर्शनं केली.

<><><><><><>

मराठा सरदार रघुजी भोसले यांची तलवार मुंबईत दाखल झाली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल या तलवारीचं अनावरण केलं. लंडनमध्ये नुकत्याच झालेल्या लिलावात राज्य सरकारनं ४७ लाख १५ हजार रुपये खर्च करून ही तलवार ताब्यात घेतली.

<><><><><><>

ज्येष्ठ अभिनेता अच्युत पोतदार यांचं काल रात्री ठाण्यातल्या ज्युपिटर रुग्णालयात निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते.

मध्यप्रदेशातल्या मराठी भाषक कुटुंबात जन्मलेले पोतदार यांचं बालपण आणि शिक्षण इंदूरमधे झालं. रेवा इथल्या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर ते लष्करात भरती झाले, आणि कॅप्टन म्हणून १९६७ मधे निवृत्त झाले. नंतर इंडियन ऑईलमधे नोकरीत असताना त्यांनी
अभिनयाचा छंद जोपासला. नंतर मराठी रंगभूमी, दूरचित्रवाहिनी मालिका, आणि चित्रपटांमधे विविध चरित्र भूमिकांमधे त्यांनी ठसा उमटवला. १९८० मधे ‘आक्रोश’ आणि ‘अल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यों आता है’ या गाजलेल्या चित्रपटात त्यांनी काम केलं आणि नंतर ‘अर्धसत्य’, ‘नासूर’, ‘तेजाब’, ‘प्रहार’, ‘वंश’, ‘चमत्कार’, ‘रंगीला’, ‘अग्निसाक्षी’, ‘तीसरी आंख’, ‘परिणीता’ अशा तब्बल सव्वाशे चित्रपटांमधे त्यांनी काम केलं. ‘थ्री ईडियट्स’ या चित्रपटातला "अरे कहना क्या चाहते हो?" हा त्यांचा

संवाद तुफान लोकप्रिय ठरला. त्याखेरीज ९५ दूरचित्रवाहिनी मालिका, २६ नाटकं त्यांच्या नावावर जमा आहेत.

त्यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी ठाण्यात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**<><><><><><>**

मिरा-भाईंदर शहराचे पहिले आमदार गिल्बर्ट मेडोन्सा यांचं आज अल्पशा आजाराने निधन झालं. ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्यावर मुंबईतल्या एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. २००९मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारीवर ते मिरा भाईंदरचे पहिले आमदार म्हणून निवडून आले होते. पश्चिम रेल्वेच्या मिरारोड स्थानकावरन उपनगरीय रेल्वे सुरू करण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला होता.

**//<><><><><><>//**